महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्रमांक–सुप्रमा-१२१६/प्र.क्र.८३२/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ३० ऑक्टोबर २०१७.

विषय :- पोलीस ठाणे, राधानगरी, तालुका-राधानगरी, जिल्हा-कोल्हापूर, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे उर्वरित बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :-
१) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक सीआरपी-०१०८/ ४१/ प्र.क्र.३४/ पोल-७, दिनांक १०.०३.२००८.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-ब/ २८-ब-२/ राधानगरी-पो.ठा./ २४१/ २००७, दिनांक ०१.१२.२०१६.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ राधानगरी-पो.ठा./ २४१/ २००७, दिनांक ०८.०८.२०१७.

ज्ञापन.-

पोलीस ठाणे, राधानगरी, तालुका-राधानगरी, जिल्हा-कोल्हापूर, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यास **रु.३०.३९ लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजास शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीआरपी.०१०८/४१/प्र.क्र.३४/पोल-७, दिनांक १०.०३.२००८, द्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. उक्त कामासाठी सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात १०० टक्के निधी वितरीत करण्यात आला होता.

२. तथापि, नियोजित जागेत मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम होऊ शकत नाही, असे पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, कोल्हापूर, यांनी दिनांक २०.१२.२०११ रोजी केलेल्या संयुक्त स्थळ निरीक्षणात निदर्शनास आले. म्हणून प्रस्तावित बांधकामासाठी सुधारित नकाशा तयार करण्यात आला ज्या मध्ये अधू व्यक्तींकरिता रॅम्प, *"Fire Fighting System," "Rainwater Harvesting System,"* इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला. नवीन नकाशाप्रमाणे उपलब्ध निधीतून अभ्यागत कक्ष *(Visitors Room)*, "आय.ओ. रुम," प्रतीक्षालय *(Waiting Room)*, "फीमेल लॉक अप रुम" व प्रसाधनगृह यांचे बांधकाम करण्यात आले.

३. आता मंजूर नकाशातील उर्वरित बांधकाम *(तळ मजला-२०७.७६ चौ.मी. + पहिला मजला-१७१.६८ चौ.मी. = **३७९.४४ चौ.मी.**)* करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी सादर केला आहे.

४. उक्त कामासाठी सहायक अभियंता, श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उप-विभाग, राधानगरी, यांनी सन २०१५-१६ च्या दरसूचीनुसार तयार केलेले रु.१७०.६३ लक्ष इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले आहेत. हे खर्चाचे अंदाज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, आणि अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, कोल्हापूर, यांनी साक्षांकित केले आहेत.

५. उक्त खर्चाचे अंदाज सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई, यांनी तपासले आहे व ते **रु.१८२.२७ लक्ष** असे सुधारित केले आहेत व त्याप्रमाणे, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

६. त्या अनुसार, पोलीस ठाणे, राधानगरी, तालुका-राधानगरी, जिल्हा-कोल्हापूर, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे उर्वरित बांधकाम *(तळ मजला-२०७.७६ चौ.मी. + पहिला मजला-१७१.६८ चौ.मी. = **३७९.४४ चौ.मी.**)* करण्यासाठी **रु.१८२.२७ लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) बांधकामाचा नमुना नकाशा, मांडणी नकाशा आणि विस्तृत नकाशा यांना वास्तुविशारदाकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.

२) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

३) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदींबाबत विस्तृत खर्चाचे अंदाज मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

४) प्रत्यक्ष काम करताना शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४, अनुसार कार्यवाही करावी.

५) निधी उपलब्ध झाल्याशिवाय बांधकामास सुरवात करु नये.

६) पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, यांनी खर्चाचे अंदाज साक्षांकित करावे.

७. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ८००, इतर खर्च, (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे, (४०७० ०२११), ५३, मोठी बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५०२/इमा-२, दिनांक २३.०५.२०१७ व दिनांक २५.०९.२०१७ यांच्या अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७१०३०१०२८४८४१२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d44 3b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.10.30 10:16:19 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.
३) पोलीस अधीक्षक, कोल्हापूर.

प्रत :-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, कोल्हापूर (*सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग (*सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
३) जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).